

# इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्नमध्ये होणार लगानचा प्रीमियर

मेलबर्नच्या इंडियन फिल्म फेस्टिव्हलच्या १७ व्या एडिशनमध्ये प्रख्यात चित्रपट लगानचे स्पेशल स्क्रिनिंग होणार आहे. यावेळी आमिर खान देखील सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या फेस्टिव्हलचे आयोजन १३ ते २३ ऑगस्ट या कालावधीत मेलबर्न येथे होणार आहे.

आशुतोष गोवारीकर यांच्या दिग्दर्शनात बनलेला हा पीरियड स्पोर्ट्स ड्रामा फिल्म भारतीय सिनेमाच्या सर्वात प्रख्यात चित्रपटांपैकी एक असून तो बेस्ट फॉरेन लँग्वेज चित्रपटासाठी ॲकॅडमी पुरस्काराकरिता नामांकित झाला होता. आमिर मेलबर्नच्या एसीएमआय सिनेमामध्ये स्पेशल स्क्रिनिंगमध्ये सहभागी होईल व या वर्षाच्या फेस्टिव्हलची सुरुवात करेल. फेस्टिव्हल डायरेक्टर मितु भौमिक लांग यांनी म्हटले आहे की, लगानच्या २५ वर्षे पूर्ण होण्याचा उत्सव साजरा करणे महोत्सवाची सुरुवात करण्याची एक योग्य पद्धत आहे. मेलबर्नचा इंडियन फिल्म फेस्टिव्हल नेहमी अशा कथांचा उत्सव साजरा करतो, ज्यांनी प्रेक्षकांवर खोलवर प्रभाव टाकला आहे. त्यामुळे आमच्या १७ व्या एडिशनची सुरुवात लगानची २५ वर्षे पूर्ण होण्याच्या उत्सव साजरा करण्यापेक्षा उत्कृष्ट पद्धत कोणती असूच शकली नसती, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.